# <u>एक</u>

गुरूंची मजवर माया इतकी
लाविली न शिस्तच मजला कधी
माऊली ते माझी मी त्यांचा बाळ की
म्हणाले न ये बैस लाव समाधी ||१||

घेतले नेहमी माझ्याच कलाने
अडविले ना दिले करू हवे  ते
होती साधना निर्णय मीच घेणे
फळ मीच परिणामा सामोरे जाणे ||२||

पडता उठविले दिला आधार
दुखता केले दुःखाचे निवारण
शिकविले सुख दुःख दोन्ही एक
इतकेच ना गुरू शिष्यही एक ||३||

– नारायण
०७/१४/२३